जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## राज्यपाल उपस्थित राहणार

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ आज शुक्रवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक आशिष लेले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

या दीक्षान्त समारंभात १४ हजार २६९ विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत, तर ३७ हजार २२३ विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येणार आहे. पारितोषिकप्राप्त १८, तर पीएच.डी. प्राप्त ३८ स्नातकांना या समारंभात गौरवण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी विद्यापीठाने केली आहे.

मुख्य इमारतीपासून ते दीक्षान्त समारंभस्थळापर्यंत मंडप उभारण्यात आला आहे. पदवी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी ५० स्टॉल उभारण्यात आले आहेत. विशेष म्हणजे स्नातकांना कोणत्या स्टॉलवर आपले पदवी प्रमाणपत्र मिळणार आहे याची माहिती मोबाइलवरून मेसेजद्वारे देण्यात आली आहे. त्यामुळे यंदा पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी कोणत्याही विद्यार्थ्याला रांगेत उभा राहण्याची गरज नाही.

### असा असेल राज्यपालांचा दौरा

**राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे**



**आज शुक्रवारी जिल्हा दौऱ्यावर येणार असून, सकाळी १०.२५ मिनिटांनी त्यांचे कोल्हापूर विमानतळावर आगमन होईल. सकाळी १०.४५ वाजता ते शिवाजी विद्यापीठात येतील.**

सकाळी ११ ते दुपारी १२.१५ या कालावधीत ते विद्यापीठातील दीक्षान्त समारंभास उपस्थित राहतील.

**दुपारी १२.१५ ते १.१५ पर्यंत ते विद्यापीठातील गेस्ट हाऊसवर थांबणार आहेत. त्यानंतर दुपारी १.३० वाजता ते कोल्हापूर विमानतळावरून मुंबईकडे रवाना होणार आहेत.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## राज्यपाल राधाकृष्णन यांची उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ उद्या, शुक्रवारी सकाळी अकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात केंद्रीय पद्धतीने होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. आशिष लेले, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित असणार आहे. यंदा एकूण ५१ हजार ४९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे.

या समारंभात जयसिंगपूर येथील बंडू राजू कोळी या विद्यार्थ्याला सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक आणि मडगाव येथील क्रिशा अल्डा नोरोन्हा हिला मानसशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दलचे कुलपती सुवर्णपदक मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहे. या समारंभाच्या तयारीचा गुरुवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आढावा घेतला. या समारंभाचे विद्यापीठाकडून ऑनलाईन प्रक्षेपण केले जाणार आहे.

दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी अर्ज भरताना त्यात 'इन-पर्सन' असा विकल्प निवडला आहे, त्यांना पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठात दीक्षान्त समारंभामध्ये सकाळी साडेसात ते दुपारी अकरा आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी सहा वाजेपर्यंत परीक्षा भवन क्रमांक दोन येथे वितरित केली जाणार आहेत.

**विविध ५४ पदके, पारितोषिकांचे वितरण**

या समारंभात व्यासपीठावर मान्यवरांच्या हस्ते विविध ५४ विद्यार्थ्यांना पदक, पारितोषिकांचे

पान ९ वर >>

## शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

>> पान I वरून

वितरण केले जाणार आहे. त्यात दोन सुवर्णपदक, सोळा पारितोषिके आणि पीएच.डी. प्राप्त ३८ स्नातकांच्या प्रमाणपत्रांचा समावेश आहे. राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह राजेयादव यांनी 'करवीर निवासिनी मंदिराचा संवादशास्त्रीय अभ्यास' या विषयावर पीएच.डी. केली आहे. त्यासाठी त्यांनी १७ वर्षे संशोधन केले आहे. त्यांना पदवीचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते दिले जाणार आहे.

17 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## ५१,४९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देणार : १६ स्नातकांचा होणार गौरव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी सकाळी ११ वाजता राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या दीक्षांत समारंभात बंडू कोळी याला राष्ट्रपती सुवर्णपदक तर नोरोन्हा क्रिशा अल्दाला कुलपती सुवर्णपदक देऊन सन्मानित केले जाईल.

दीक्षांत समारंभात यंदा ५१ हजार ४९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. यामध्ये १४ हजार २३९ विद्यार्थी प्रत्यक्ष तर ३७ हजार २२३ जण पोस्टाने पदवी प्रमाण स्वीकारणार आहेत. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी स्टॉल उभारण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कोणत्या स्टॉलवर पदवी प्रमाणपत्र मिळणार याची माहिती एसएमएसद्वारे मिळणार आहे. तसेच १६ स्नातकांना पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे. ३८ स्नातकांना प्रत्यक्ष पाहुण्यांच्या हस्ते पीएच. डी. पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. दीक्षांत समारंभात पहिल्यांदाच इंग्रजी व मराठी भाषेत द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संयुक्त पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. ५१ हजार ४९२ पैकी २८ हजार ५९२ विद्यार्थिनी व २२ हजार ८९७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दीक्षांत समारंभाला राज्यपाल येणार असल्याने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.


डॉ. आशिष लेले


सी. पी. राधाकृष्णन्



17 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभास ग्रंथ दिंडीने प्रारंभ

## विद्यार्थ्यांकडून टाळ-मृदंगाचा गजर; वाचन संस्कृतीचा जागर, प्रबोधनपर घोषणा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (दि. १७) होणार आहे. समारंभाची सुरुवात गुरुवारी ग्रंथ दिंडीसह दोनदिवसीय ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनाने झाली.

दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने गुरुवारी सकाळी कमला महाविद्यालय येथे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीत भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यासह राजर्षी शाहू ग्रंथ, आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात ग्रंथ दिंडीला प्रारंभ झाला. राज्य शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अभियानासह वाचन संस्कृतीचा जागर व प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा व सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पालखी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात नेण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली. पालखी मार्गावर सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साह ओसंडून वाहत होता.

ग्रंथ दिंडीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. तानाजी चौगले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील आदींनी सहभाग घेतला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीस पालखी पूजनाने प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : पप्पू अत्तार)

### एनसीसी, एनएसएसचे संचलन

ग्रंथदिंडीमध्ये शहरातील महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग लक्षणीय होता. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलन लक्षवेधी ठरले. शालेय विद्यार्थ्यांच्या ढोल व झांज पथकांनी लक्ष वेधून घेतले.

### कुलगुरूंचा उत्साह...

आवेशपूर्ण पद्धतीने ढोल, ताशा व झांज वादन करीत ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांनी उत्साह आणला. कुलगुरू डॉ. शिर्के यांना वादन करण्याचा व त्यांच्यासमवेत छायाचित्र काढून घेण्याचा मोह आवरला नाही.



दीक्षान्त समारंभानिमित्त काढलेल्या ग्रंथ दिंडीत सहभागी झालेले विद्यार्थ्यांचे ढोल-ताशा व झांजपथक.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## संलग्न महाविद्यालयांतील ५१ हजारांवर स्नातकांना मिळणार पदवी; प्रमाणपत्र वितरणासाठी ५० स्टॉल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (दि. १७) विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलपती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

कार्यक्रमास उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन नियंत्रक मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, पान २ वर

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

(पान १ वरून)

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित असणार आहेत.

या वर्षीच्या दीक्षान्त समारंभात जैवरसायनशास्त्र विभागातील बंडू कोळी यास राष्ट्रपती सुवर्णपदक व गोवा येथील मानसशास्त्र विभागातील क्रिशा अल्दा नोरोन्हा हिला कुलपती पदक प्रदान करण्यात येणार आहे. दीक्षान्त समारंभात १४ हजार २६९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून, तर ३७ हजार २२३ स्नातक पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत. तसेच, १६ पारितोषिके, ३८ स्नातकांना पीएच.डी. प्रदान करण्यात येणार आहेत.

यावर्षी विद्यार्थ्यांना थेट मोबाईलवर पदवी प्रमाणपत्र मिळेल, अशी सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठ परीक्षा विभाग परिसरात पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी ५० स्टॉल उभारले आहेत. पदवी संपादन करणाऱ्या स्नातकांमध्ये मुलींची संख्या सर्वाधिक असून, त्यांचे प्रमाण ५५ टक्के आहे. प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणाऱ्यांमध्ये ५ हजार ८५६ विद्यार्थी, तर ८ हजार ४१३ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

17 JAN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ग्रंथमहोत्सवास उत्साही प्रारंभ

## टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी : झांजपथकाने रंगत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ आज, शुक्रवारी साजरा होत आहे. या सोहळ्याची सुरुवात गुरुवारी सकाळी ग्रंथदिंडीसह दोनदिवसीय ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटनाने झाली.

कमला महाविद्यालय येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यांसह राजर्षी शाहू ग्रंथ, आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवण्यात आले होते. तेथून टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात प्रविष्ट झाली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली. ग्रंथदिंडीत कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर, आदी सहभागी झाले.



शिवाजी विद्यापीठाच्या ६१व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील सहभागी झाले.

### वाचकांना पर्वणी

स्थानिकांसह नवी दिल्ली येथीलही १७ प्रकाशक व ग्रंथविक्रेते महोत्सवाते सहभागी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. ग्रंथप्रेमी व वाचनवेड्या व्यक्तींसाठी हे प्रदर्शन म्हणजे एक पर्वणीच आहे. याखेरीज येथे खाद्यपदार्थ व पेय विक्रीचे ११ स्टॉल आहेत.

17 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथदिंडीतून वाचनाचा संदेश

## ग्रंथदिंडीत लेझीम, झांजपथकाच्या गजर : पारंपरिक वेशभूषांसह गांधी टोपी ठरले आकर्षण





कोल्हापूर : दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर कमला कॉलेज येथे गुरुवारी ग्रंथदिंडीचे पूजन करून या ग्रंथदिंडीत सहभागी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख. डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी. ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थी.


**प्रतिनिधी**
कोल्हापूर


कमला कॉलेजमधून गुरुवारी सकाळी निघालेल्या ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सामाजिक संदेश देणाऱ्या पथनाट्यांचे सादरीकरण केले, झांजपथक, लेझीम पथकांचा त्यात सहभाग होता. ग्रंथदिंडीतून ग्रंथवाचन आणि मराठी भाषा, संस्कृतीचा जागर केला. दिंडीत जवळपास एक हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी पोस्टरच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचा संदेश दिला.

कमला कॉलेजमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौकमार्गे लोककला केंद्रात ग्रंथदिंडीची सांगता करण्यात करण्यात आली. यावेळी प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, ग्रंथालय संचालक डॉ.डी.बी. सुतार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

### ग्रंथदिंडीतून मराठी ग्रंथाचे महत्व

ग्रंथदिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी 'ग्रंथाची ओळख काळाची गरज, 'ज्ञान म्हणजे आत्मतत्वांचा बोध, 'ग्रंथ हेच गुरू, 'वाचन, चिंतन मनन म्हणजेच अध्ययन, 'पुस्तकांचे रोज करावे पठण, ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती. 'आता नको उशीर, तृणधान्याचा आहारच फायदेशीर, अशा पोस्टरच्या माध्यमातून मराठी व वाचन संस्कृतीविषयी जगजागृती करण्यात आली.

### भारतीय, विदेशी पुस्तके विक्रीसाठी

दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. एस. एस. रंगनाथन, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन, दीपप्रज्वलनाने करण्यात आले. ग्रंथमहोत्सवामध्ये भारतीय, परदेशी प्रकाशनाची पुस्तके, डेटाबेस पॅकिज, डिजीटल ग्रंथ, उपहारगृह आदींचे स्टॉल आहेत. कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी पुस्तकांच्या स्टॉलची पाहणी केली.

ग्रंथमहोत्सवात स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रमाच्या पुस्तक खरेदीसाठी विद्यार्थ्यांची गर्दी होती. महिला बचत गटांतर्फे उभारलेल्या चहा, कॉफी, नाष्टा स्टॉलवर खवैय्यांनी गर्दी होती. खरेदीसाठी विद्यार्थी, प्राध्यापकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. या सर्व स्टॉलची कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी पाहणी केली आणि विक्रेत्यांकडून पुस्तकांविषयी माहिती घेतली. प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनीही महोत्सवातील स्टॉलवरील पुस्तक खरेदी करून पुस्तक निधी संपवण्याचा प्रयत्न केला.

17 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील ग्रंथ महोत्सवात वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथांची पर्वणी

## प्रयोगशील पोषक खाद्य पदार्थांचे स्टॉल; स्टार्टअप उपक्रमांचा समावेश




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त भरविण्यात आलेल्या ग्रंथ महोत्सवामधील स्टॉलवरील पुस्तकांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथ महोत्सवाचे गुरुवारी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.


ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन झाले. स्थानिकांसह नवी दिल्ली येथील १७ प्रकाशक व ग्रंथ विक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहण्यासाठी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. ग्रंथप्रेमी व वाचनवेड्यांसाठी हे प्रदर्शन पर्वणी ठरणार आहे. ग्रंथ महोत्सवातील स्टॉलची कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी पाहणी करून सहभागींना शुभेच्छा दिल्या.

### एमबीए, फूड अँड टेक विभागांचे स्टॉल्स

ग्रंथमहोत्सवात खाद्यपदार्थ व पेय विक्रीचे ११ स्टॉल लावण्यात आले आहेत. तसेच एमबीए अधिविभाग, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागांच्या विद्यार्थ्यांनी काही प्रयोगशील पोषक खाद्यपदार्थांसह चॉकलेटस्, ज्यूस, उसाचा रस यांचे स्टॉल लावले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, एसयूके-आरडीएफ कंपनी यासह स्टार्टअप उपक्रमाला वाहिलेल्या स्टॉलचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025

सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवाला गुरुवारी विद्यार्थिनींनी भेट दिली.
(बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथांची वाचकांना पर्वणी

कोल्हापूर, ता. १६ : वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथ, पुस्तकांची वाचकांना पर्वणी असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथमहोत्सवाचा आज प्रारंभ झाला. या वर्षापासून मुख्य प्रशासकीय इमारत आणि विस्तार (अनेक्स) इमारत यामधील मोकळ्या प्रांगणात भरविण्यात आलेल्या महोत्सवाला दिवसभर विद्यार्थी, शिक्षक, नागरिकांनी भेट दिली. त्यामुळे हा परिसर गर्दीने फुलला.

ग्रंथदिंडीनंतर सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून हे उद्घाटन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. स्थानिकांसह नवी दिल्ली येथीलही १७ प्रकाशक व ग्रंथविक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

17 JAN 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने निर्माण केलेल्या 'तुकोबांची अभंगवाणी' या चित्रफीत-ध्वनिमुद्रिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, गायिका डॉ. साधना शिलेदार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# साधना शिलेदार यांच्या गायनाची रसिकांवर मोहिनी

## विद्यापीठातर्फे 'तुकोबांची अभंगवाणी' चित्रफीत-ध्वनिमुद्रिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार यांच्या मधूर अभंग गायनाने कोल्हापूरकर रसिकांना मंत्रमुग्ध करीत त्यांच्यावर मोहिनी घातली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभाचे!

### लॉकडाऊनच्या काळात मिळाले आनंदाचे काम

डॉ. साधना शिलेदार यांनी नागपूर येथील निवासस्थानी लॉकडाऊन काळात 'तुकोबांच्या अभंगवाणी'ला चाली लावण्याचे काम केले. याकाळात मला आनंद देणारे असे काम होते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तेव्हा एक हार्मोनियम व तबला अशा दोन साथीदारांच्या जोडीने रेकॉर्डिंग केले होते. मात्र, शिवाजी विद्यापीठामध्ये साथीदारांसमवेत तुकारामांचे अभंग सादर करताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, असे उद्गार त्यांनी काढले.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने बजावली आहे. गुरुवारी सकाळी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त डॉ. शिलेदार यांच्या गायनाचा विशेष कार्यक्रम झाला. यावेळी 'तुकोबांची अभंगवाणी' या सीडी स्वरूपातील चित्रफीत-ध्वनिमुद्रिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिलेदार यांनी ध्वनिमुद्रिकेसाठी गायिलेल्या काही अभंगर चनांचे सादरीकरण केले. कार्यक्रमास सांगोल्याचे ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी प्रत्येक अभंगरचनेविषयी निवेदन केले. संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी आभार मानले.

17 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘तुकोबांची अभंगवाणी’ने रसिक मंत्रमुग्ध

## डॉ. साधना शिलेदार यांचे सुरेल गायन : ‘तुकोबांची अभंगवाणी’ चित्रफीत–ध्वनीमुद्रिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार यांच्या मधुर अभंग गायनाने कोल्हापूरकर रसिक मंत्रमुग्ध झाले.

ध्वनीमुद्रिकेसाठी गायिलेल्या काही अभंगरचनांचे सादरीकरण केले. संत तुकाराम यांच्या वेगवेगळ्या पद्धतीच्या अभंगांना त्यांनी किती ताकदीने स्वरसाज चढविला आहे, याची प्रचिती त्यांना ऐकताना रसिकांना येत होती. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभाचे.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने बजावली आहे. विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त डॉ. साधना शिलेदार यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

त्यावेळी ‘तुकोबांची अभंगवाणी’ या सीडी स्वरुपातील चित्रफीत–ध्वनीमुद्रिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात ‘तुकोबांची अभंगवाणी’ गाताना गायिका डॉ. साधना शिलेदार.

डॉ. शिलेदार यांनी तुकारामांचे अभंग वेगवेगळ्या रागांमध्ये आळवले. जोडोनिया कर, उभा राहिला समोर (राग– रागेश्री, अहिर भैरव, ललत), देवा आता ऐसा करी उपकार (झिंझोटी), अगा ये उदारा (बिहाग), आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने (जोग), उदंड देखिले (श्यामकल्याण, नंद, शंकरा), रंगी रंगे नारायण (बिंद्रावती सारंग), हरी तुझे नाम गाईन अखंड (किरवाणी), बोलावा विठ्ठल (विभास, तोडी) आणि आपुल्या माहेरा जाईन मी आता भैरवी रागात सादर केला.

### लॉकडाऊनच्या काळात मिळालेले आनंदाचे काम

डॉ. साधना शिलेदार यांनी आपल्या नागपूर येथील घरी कोविड–१९ च्या लॉकडाऊन काळात ‘तुकोबांच्या अभंगवाणी’ला चाली लावण्याचे काम केले. त्या काळामध्ये मला आनंद देणारे असे काम होते, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. तेव्हा अवघा एक हार्मोनियम आणि तबला अशा दोन साथीदारांच्या जोडीने रेकॉर्डिंग केले होते. शिवाजी विद्यापीठामध्ये इतक्या दर्जेदार साथीदारांसमवेत तुकारामांचे अभंग सादर करताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, असे उद्गार त्यांनी काढले.

सांगोल्याचे ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी अभंगरचनेविषयी निवेदन केले. तबला निखिल मडवी, व्हायोलिन केदार गुळवणी, बासरी डॉ. सचिन जगताप, पखवाज ऋषीकेश देशमाने, हार्मोनियम स्वरुप दिवाण, साइड ऱ्हिदम व टाळ हरिष केळकर या वादकांनी अत्यंत समर्थ साथ दिली. तंबोरा आणि कोरससाठी अन्वी बालावलकर, अभय हावळ, कौस्तुभ शिंदे, संपदा गावस या कलाकारांनी साथ केली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्यासह रसिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

17 JAN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात 'तुकोबांची अभंगवाणी' या चित्रफीत-ध्वनीमुद्रिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी झाले. यावेळी प्रख्यात गायिका डॉ. साधना शिलेदार, डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

# साधना शिलेदारांच्या अभंग गायनाने रसिक मंत्रमुग्ध

## विद्यापीठातर्फे 'तुकोबांची अभंगवाणी' चित्रफीत-ध्वनीमुद्रिकेचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रख्यात शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार यांच्या मधुर अभंग गायनाने कोल्हापूरकर रसिक गुरुवारी मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ६१व्या दीक्षांत समारंभाचे!

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने बजावली आहे. डॉ. साधना शिलेदार यांच्या गायनाचा विशेष कार्यक्रम आयोजित केला. त्यावेळी 'तुकोबांची अभंगवाणी' या सीडी स्वरूपातील चित्रफीत-ध्वनीमुद्रिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिलेदार यांनी या ध्वनीमुद्रिकेसाठी गायिलेल्या काही अभंगरचनांचे सादरीकरण केले. डॉ. शिलेदार यांनी तुकारामांचे अभंग वेगवेगळ्या रागांमध्ये बांधले आहेत. या अभंगांमध्ये जोडोनिया कर, उभा राहिला समोर (राग-रागेश्री, अहिर भैरव, ललत), देवा आता ऐसा करी उपकार (झिंझोटी), अगा ये उदारा (बिहाग), आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने (जोग), उदंड देखिले (श्यामकल्याण, नंद, शंकरा), रंगी रंगे नारायण (बिंद्रावती सारंग), हरी तुझे नाम गाईन अखंड (किरवाणी), बोलावा विठ्ठल (विभास, तोडी), आपुल्या माहेरा जाईन मी आता (भैरवी) यांचा समावेश आहे.

**६१**
**व्या दीक्षांत समारंभाचे निमित्ताने कार्यक्रम**

यातील काही निवडक रचना डॉ. शिलेदार यांनी आज सादर केल्या. कार्यक्रमात सांगोल्याचे ज्ञानेश्वर बंडगर यांनी निवेदन केले. डॉ. शिलेदार यांना कार्यक्रमात निखिल मडवी (तबला), केदार गुळवणी (व्हायोलिन), डॉ. सचिन जगताप (बासरी), ऋषिकेश देशमाने (पखवाज), स्वरूप दिवाण (हार्मोनियम), हरीष केळकर (साइड ऱ्हिदम व टाळ) या वादकांनी अत्यंत समर्थ साथ दिली. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले, तर डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी आभार मानले.

17 JAN 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. साधना शिलेदार यांच्या अभंग गायनाने रसिक मंत्रमुग्ध

## 'तुकोबांची अभंगवाणी' चित्रफीत-ध्वनिमुद्रिकेचे प्रकाशन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'तुकोबांची अभंगवाणी' गाताना डॉ. साधना शिलेदार.

कोल्हापूर, ता. १६ : प्रख्यात शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार यांच्या मधूर अभंग गायनाने कोल्हापूरकर रसिक आज मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभाचे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने बजावली आहे.

विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त डॉ. शिलेदार यांच्या गायनाचा विशेष कार्यक्रम झाला. त्यावेळी 'तुकोबांची अभंगवाणी' या सीडी स्वरूपातील चित्रफीत-ध्वनिमुद्रिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी आभार मानले.

डॉ. शिलेदार यांनी या ध्वनिमुद्रिकेसाठी गायलेल्या काही अभंगरचनांचे सादरीकरण केले. त्यांनी तुकारामांचे अभंग वेगवेगळ्या रागांमध्ये बांधले आहेत. या अभंगांत जोडोनिया कर, उभा राहिला समोर, देवा आता ऐसा करी उपकार, अगा ये उदारा, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, उदंड देखिले, रंगी रंगे नारायण, हरी तुझे नाम गाईन अखंड, बोलावा विठ्ठल, आपुल्या माहेरा जाईन मी आता यांचा समावेश आहे. सांगोल्याचे ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी निवेदन केले. निखिल मडवी, केदार गुळवणी, डॉ. सचिन जगताप, ऋषिकेश देशमाने, स्वरूप दिवाण, हरिष केळकर या वादकांनी आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या अन्वी वालावलकर, अभय हावळ, कौस्तुभ शिंदे, संपदा गावस या कलाकारांनी साथ केली.

17 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी प्रमाणपत्र सुरक्षेसाठी 'ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी'

**प्रमाणपत्रांची वैधता तपासणे होणार सोपे**

**नॉन टेरेबल पेपरवर पदवी प्रमाणपत्रांची छपाई होणार**

**पुढील दीक्षांत समारंभापासून होणार वापर**



तरुण भारत स्पेशल स्टोरी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

विद्यापीठांचे नकली प्रमाणपत्र वापरून शिक्षण किंवा नोकरी मिळवण्याचा अनेकदा प्रयत्न केल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे पदवी प्रमाणपत्रांच्या सुरक्षेसाठी 'ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी' वापरण्याचा शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचा मानस आहे. जेणेकरून प्रमाणपत्रांची वैधता तपासणे आणि खोट्या प्रमाणपत्रांच्या वापरास आळा घालणे सहज शक्य होणार आहे. तसेच सध्या प्रमाणपत्रांसाठी वापरला जाणारा कागद फाटू शकतो म्हणून भविष्यात प्रमाणपत्रांसाठी 'नॉन टेरेबल पेपर' वापरून त्याची कालमर्यादा वाढवण्याचा प्रयत्न परीक्षा विभाग करणार आहे.

राज्यभरासह शिवाजी विद्यापीठातील नकली पदवी प्रमाणपत्रांचा वापर करून



शिक्षण किंवा नोकरी मिळवण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत. संबंधितांवर विद्यापीठ प्रशासनाने कायदेशीर कारवाईदेखील केली आहे. तरीदेखील विद्यापीठातील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अर्थकारणाच्या माध्यमातून बनावट प्रमाणपत्र मिळवण्याचा प्रकार काही केल्या थांबत नाही. यातून विद्यापीठाचीच सर्वत्र बदनामी होते. या गोष्टी लक्षात आल्याने शिवाजी विद्यापीठ पदवी प्रमाणपत्राच्या सुरक्षेसाठी 'ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी' वापरली जाणार आहे. त्यादृष्टीने परीक्षा विभागातील अधिकारी कामाला लागले आहेत.

### दुबार पदवी प्रमाणपत्र मागणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होणार

भविष्यात तंत्रज्ञानाच्या वापराबरोबर पदवी प्रमाणपत्र फाटू नये, अनेक वर्षे सुरक्षित राहण्यासाठी 'नॉन टेरेबल पेपर'चा वापर करून पदवी प्रमाणपत्र तयार केले जाणार आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना पाहिजे तेवढी वर्षे हे प्रमाणपत्र आपल्या फाईलमध्ये सुरक्षित ठेवता येईल. तसेच प्रमाणपत्र खराब झाले म्हणून दुबार पदवी प्रमाणपत्र मागणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही कमी होईल. या पेपरमुळे कागदपत्रांची कालमर्यादा वाढून कायमस्वरूपी रेकॉर्ड राहण्यासाठी मदत होणार आहे.

### विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती नमूद

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती म्हणजे नाव, पीएनआर नंबर, आधारकार्ड नंबर, एबीसी नंबर आदी माहिती नमूद केली आहे. त्यामुळे 'ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी'चा वापर करून विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची वैधता तपासून बनावट प्रमाणपत्रे शोधणे व आळा घालण्यास मदत होणार आहे.

आतापर्यंत परीक्षेत तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा सुरळीत करण्याचा विद्यापीठाने वारंवार प्रयत्न केला आहे. ऑनलाईन प्रवेशासह परीक्षा अर्ज भरणे, पेमेंट गेटवेच्या माध्यमातून शुल्क भरणे, एसआरपीडीच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका पाठवणे, पेपर सेटींगही ऑनलाईन पध्दतीने करणे. आता ऑनस्क्रिन पेपर तपासणीचा प्रयोगही परीक्षा विभाग यशस्वीपणे राबवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यापुढे जाऊन पदवी प्रमाणपत्राची माहिती आणि प्रमाणपत्रही विद्यार्थ्यांना ऑनलाईन पाठवले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र क्यूआर कोड तयार करून दिला आहे. ग्रामीण भागातील विद्यापीठाच्या तांत्रिक प्रगतीचे कौतुक राज्यभरातील विद्यापीठांच्या एका बैठकीत राज्यपालांनी केले असून इतर विद्यापीठांना अनुकरण करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे वारंवार नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत असून आता पदवी प्रमाणपत्राच्या सुरक्षेसाठी 'ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी' वापर करण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे.

### पदवी प्रमाणपत्रावर सिक्युरिटी कोड अद्यावत

"शिवाजी विद्यापीठातील पदवी प्रमाणपत्रावर सिक्युरिटी कोड अद्यावत केले आहेत. परंतु पदवी प्रमाणपत्राच्या सुरक्षेसाठी पुढच्या दीक्षांत समारंभापासून ब्लॉक चेन टेक्नॉलॉजीचा वापर करणार आहे.

- डॉ. अजितसिंह जाधव
(संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ)

17 JAN [illegible]

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्याच्या तुलनेत विद्यापीठात मुलींची संख्या अव्वल

## २८ हजार ५९२ विद्यार्थीनी पदवी प्रमाणपत्र घेणार : राज्यभरातील विद्यापीठात मुलींच्या संख्येत घट

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्यभरातील नामवंत विद्यापीठांमध्ये मुलींच्या संख्येत घट होत असताना शिवाजी विद्यापीठात मात्र मुलींमध्ये वाढ होत आहे. महाविद्यालयासह अधिविभागात शिक्षण घेण्यातही मुलीच अव्वल असल्याचे चित्र आहे. तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयात १ लाख १४ हजार ८२ तर अधिविभागांमध्ये २ हजार ६४७ मुली सध्या शिक्षण घेत आहेत. तसेच यंदा २८ हजार ५९२ विद्यार्थीनी पदवी प्रमाणपत्र घेणार आहे. शिक्षणाबरोबर संशोधनातही मुली अव्वल आहेत. ग्रामीण भागातील विद्यापीठांमध्ये मुलींची संख्या वाढणे शिवाजी विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १९६२ मध्ये झाली आहे. परंतू पहिल्या दीक्षांत समारंभ १९६४ साली




झाला. तेव्हा १९९ मुलींनी पदवी प्रमाणपत्र घेतली होती. ती १९७४ मध्ये १६२३ तर १९८४ मध्ये ३२६८ झाली. २०१८ च्या पदवी प्रदान कार्यक्रमात पदवी स्वीकारणाऱ्या मुलींची संख्या २६ हजार ९३८ इतकी होती. २०२३ मध्ये २१ हजार ९६३ मुलांनी पदवी प्रमाणपत्र स्विकारले. तर यंदा हीच संख्या २८ हजार ५९२ वर गेली आहे. याचाच अर्थ मुलींच्या संख्येत ६० टक्केपेक्षा जास्त वाढ झाली आहे. मुलींची संख्येत सातत्याने वाढ होत आहे. गतवर्षी राष्ट्रपती

**विद्यापीठ अंतर्गत कॉलेज स्तरावरील प्रमाण**

| अभ्यासक्रम | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| पदवी | ८०७७ | १०९३६ | १९०१३ |
| पदव्युत्तर | १००२८१ | १०३१४६ | २०३०४१ |

**शिवाजी विद्यापीठ अधिविभाग**

| अभ्यासक्रम | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| पदवी | १४९७ | २११३ | ३६१० |
| पदव्युत्तर | ८६१ | ५३४ | १३९५ |

सुवर्णपदक आणि कुलपती सुवर्णपदकही मुलींनाच मिळाले होते. यंदा मात्र राष्ट्रपती सुवर्णपदक बंडू कोळीला तर कुलपती सुवर्णपदक नोरोन्हा अल्दा यांना मिळाले आहे.

अध्यापनाच्या क्षेत्रात विद्यापीठाने सुरूवात ही सहा अधिविभागापासून केली होती. सुरूवातीला पारंपरिक अभ्यासक्रम सुरू केल्यानंतर या भागातील शिक्षणाची गरज ओळखून विद्यापीठाने व्यावसायीक अभ्यासक्रमही सुरू केले. शिक्षणशास्त्र, विधी, व्यवस्थापन अभ्यासक्रमांच्या यशस्वी प्रयोगानंतर विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभाग सुरू केला आहे. जुन्या पारंपरिक अभ्याक्रमाला नविनतम अभ्यासक्रमाची जोड देण्याचा विद्यापीठ प्रयत्न करत आहे. विद्यापीठात सध्या जवळपास ४८ महाविद्यालये आहेत. यामध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमाचीही संख्या उल्लेखनीय असून यामध्ये जास्तीत जास्त मुली शिक्षण घेत आहेत. सुरूवातीला विद्यापीठात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची ६० टक्केपेक्षा जास्त वाढली आहे. या विद्यार्थीनींना राहण्यासाठी वसतिगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वाढत्या विद्यार्थीनींची संख्या पाहून वसतिगृहाच्या संख्येतही दिवसेंदिवस वाढ होत आहे. सध्या ४ वसतिगृह असली तरी दिवसेंदिवस वसतिगृह अपुरी पडत असल्याचे लक्षात येत आहे. त्यामुळेच लोकसहभागातून वसतिगृहांची उभारणी करण्याची संकल्पना विद्यापीठ प्रशासनाने राबवली आहे. तसेच सुरक्षाही कडक असल्याने पालकांनी वसतिगृहात राहून शिक्षण घेण्याची परवानगी आपल्या मुलींना दिली आहे. याचाच अर्थ शिवाजी विद्यापीठ मुलींची संख्या वाढण्यासाठी वारंवार प्रयत्न करीत असल्याचे सिध्द होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ आज

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख पाहुणे आहेत. विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या दीक्षांत समारंभात बंडू कोळी याला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर नोरोन्हा क्रिशा अल्दाला कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. यंदा २२ हजार ८९७ मुलांना, तर २८ हजार ५९५ मुलींना पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार आहे.

यंदा ५१ हजार ४९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणापत्र दिले जाणार आहे. यामध्ये १४ हजार २३९ विद्यार्थी प्रत्यक्ष, तर ३७ हजार २२३ पोस्टाने पदवी प्रमाण स्वीकारणार आहेत. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी स्टॉल उभारण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कोणत्या स्टॉलवर पदवी प्रमाणपत्र मिळणार, याची माहिती एसएमएसद्वारे मिळणार आहे. १६ स्नातकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे, तर ३८ स्नातकांना प्रत्यक्ष पाहुण्यांच्या हस्ते पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. दीक्षांत समारंभात पहिल्यांदाच इंग्रजी व मराठी भाषेत द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संयुक्त पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रमाणपत्रावर क्यूआर कोड असणार आहे. त्यामुळे कोठेही पदवी प्रमाणपत्र पडताळणी करण्यास सोपे जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर पीआरएन नंबर, आधार कार्ड नंबर आणि एबीसी नंबर असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
पुढारी

# बहुजन समाजाच्या शिक्षणात संतांचे मोठे योगदान : डॉ. उंदरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बहुजनांच्या शिक्षणात संतांचे मोठे योगदान आहे. त्यांनी शिक्षणाबरोबर स्वच्छतेचेही काम केले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. सुखदेव उंदरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व शहाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेत 'संतांचे बहुजन शिक्षणातील योगदान' विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. डॉ. उंदरे म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा आहे. त्यांनी बहुजनांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. प्रवचन, कीर्तन, अभंग, भारुडे व इतर माध्यमांतूनही त्यांनी बहुजन समाजाला दिशा दिली. समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. एम. देसाई यांनी स्वागत केले. पाहुण्यांची ओळख डॉ. विशाल कुरणे यांनी करून दिली. प्रा. एस. व्ही. चौरे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अभिजित सुभाष साळुंखे, डॉ. ए. बी. बलुगडे, डॉ. शिवाजीराव जाधव, डॉ. सुरेश शिखरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
पुढारी

# सत्र परीक्षेला १४ हजार ४९० विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षेला १४ हजार ४९० विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षा विभागाकडून आजअखेर ३३८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बीए, बीएस्सी, एमबीए, एम.टेक. यासह १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. दि.१६ रोजी एमबीए (रूरल मॅनेजमेंट), एमएस्सी. (पर्यावरणशास्त्र), एम.एस्सी. (शुगर टेक्नॉलॉजी) आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

17 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टाळ-मृदंगाचा गजर, वाचनसंस्कृतीचा जागर

## उत्साहात निघाली ग्रंथदिंडी; शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १६ : टाळ-मृदंगाचा गजर, ढोल-ताशांचे वादन, प्रबोधनपर घोषणा अशा उत्साही वातावरणात आज शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी निघाली. त्यातून विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी वाचनसंस्कृतीचा जागर केला.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त गुरुवारी काढण्यात आलेल्या ग्रंथ दिंडीमध्ये सहभागी झालेले विद्यार्थिनींचे झांजपथक.

या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणारी ग्रंथदिंडी आणि ग्रंथमहोत्सव हे शहरवासीयांसह विद्यार्थी-विद्यार्थिनींच्याही आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. यंदाही ग्रंथदिंडीमधील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या उत्साही सहभागाने हीच बाब अधोरेखित केली. आज सकाळी कमला महाविद्यालय येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यांसह राजर्षी शाहू ग्रंथ, आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवले होते. तेथून टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभियानासह वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात आली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली.

ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. धनंजय सुतार, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, सागर डेळेकर, आर. जी. कुलकर्णी, तानाजी चौगले, रामचंद्र पवार, शरद बनसोडे, सचिनकुमार पाटील, प्रकाश बिलावर, अजित चौगुले, डॉ. वैभव ढेरे, अभिजित रेडेकर, डॉ. प्रवीणकुमार पाटील, शिवराज थोरात, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, सुजय पाटील आदी सहभागी झाले.

### शालेय विद्यार्थ्यांचे आवेशपूर्ण झांजवादन

■ यंदाच्या ग्रंथदिंडीमध्ये शहरातील महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग लक्षणीय होता. त्याचप्रमाणे राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलनही लक्षवेधक ठरले. मात्र, शहराचे लक्ष वेधून घेतले ते शालेय विद्यार्थ्यांच्या ढोल आणि झांज पथकांनी. अत्यंत आवेशपूर्ण अशा पद्धतीने ढोल, ताशा आणि झांज वादन करीत ग्रंथदिंडीमध्ये या मुलांनी जणू प्राण ओतला. कुलगुरू डॉ. शिर्के यांना या मुलांसमवेत वादन करण्याचा आणि त्यांच्यासमवेत छायाचित्र काढून घेण्याचा मोह आवरला नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2025
सकाळ

# प्राचार्य डॉ. माळी यांच्या पुस्तकाचे रविवारी प्रकाशन

कोल्हापूर : प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांच्या 'सुवर्णगंध' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ रविवारी (ता. १९) होणार आहे. कोळेकर तिकटी येथील अक्षर दालन येथे सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे प्रमुख पाहुणे, तर माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर हे प्रमुख वक्ते असतील. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपसचिव सतीश भारतीय यांची प्रमुख उपस्थिती असेल. दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजाभाऊ पाटील (बेळगाव) अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकाशक अमेय जोशी यांनी केले आहे.